# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर

## (गृह शाखा)

दुरध्वनी क्र. ०२१७- २७३१०२१,
Email-ID-dcbsolapur@gmail.com

वाचले :- १)आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ कलम ३०,३१,३४,४१ व ५१
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३)

जा. क्र. २०२०/डिसीबी/२/आरआर/२००८ दिनांक- २०/०३/२०२०

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेसाठी अत्यावश्यक सेवा वगळुन दुकाने बंद करणेबाबत.

**आदेश :-**

ज्याअर्थी, उपरोक्त महाराष्ट्र शासनाने राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे जागतिक आरोग्य संघटना व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रसारित केलेल्या विविध उपाययोजनांची अंमलबजावणी व राज्यात या कोरोना विषाणूमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याने साथरोग अधिनियम १८९७ च्या खंड २ नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियमातील खंड २, ३, व ४ ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु केली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. ३ नुसार जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी, सोलापूर जिल्ह्यामधील सर्व मॉल्स, आठवडी बाजार, जनावरांचे बाजार, यामध्ये नागरिकांच्या होणाऱ्या गर्दीमुळे कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सर्व आठवडी बाजार, जनावरांचा बाजार, मॉल्स, दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंदी आदेश लागू करणेत आलेला आहे.

ज्याअर्थी, सोलापूर जिल्ह्यामधील सर्व प्रकारचे सोने-चांदीची दुकाने, कापड, ॲटोमोबाईल, भांडयाची दुकाने, इलेक्ट्रीक-इलेक्ट्रॉनिक्स, टिंबर, प्लायवुड व इतर दुकाने नागरिकांच्या होणाऱ्या गर्दीमुळे कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे. तसेच यामध्ये जीवनावश्यक वस्तू, किराणा दुकाने, औषधे, फळे, भाजी चालू ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पाहता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/ इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी मिलींद शंभरकर, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी सोलापूर, सोलापूर जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ३४ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(३) अन्वये, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे लोकांचा समुह एकत्र जमू नये म्हणून सोलापूर जिल्ह्यामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी सोलापूर जिल्हयातील सर्व प्रकारचे सोने-चांदीची दुकाने, कापड, ॲटोमोबाईल, भांडयाची दुकाने, इलेक्ट्रीक-इलेक्ट्रॉनिक्स, टिंबर, प्लायवुड व इतर दुकाने (जीवनावश्यक वस्तू, किराणा दुकाने, औषधे, फळे, भाजी वगळून) दिनांक २०.३.२०२० रोजी सायंकाळी ६.०० वाजलेपासून दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. १ व २ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र असून अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचेविरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी कारवाई करावी.

जिल्हाधिकारी सोलापूर

(मिलींद शंभरकर)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
सोलापूर

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- २०/०३/२०२०

प्रत :- पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
प्रत:- पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण
प्रत :- आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
प्रत :- जिल्हा शल्यचिकीत्सक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर
प्रत :- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
प्रत :- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर,
प्रत :- चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समिती, हैद्राबाद रोड, सोलापूर
प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर क्र. १ / सोलापूर क्र. २ / मंगळवेढा / पंढरपूर / माढा / माळशिरस विभाग अकलूज
प्रत:- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर/ दक्षिण सोलापूर/ बार्शी/ अक्कलकोट/ माढा/ मोहोळ/करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस
प्रत:- मुख्याधिकारी, नगरपालिका, बार्शी/ कुर्डूवाडी/सांगोला/ पंढरपूर/ मंगळवेढा/अक्कलकोट/ मैंदर्गी/ दुधनी/ करमाळा.
प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांचेकडे, उपरोक्त आदेश जनतेच्या माहितीसाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व दैनिक/ दृकश्राव्य माध्यमातून ठळक बातमी स्वरुपात प्रसिद्ध करुन, प्रसिद्धी अहवाल इकडे पाठविणेत यावा.
प्रत :- राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
२/- सदरचा आदेश दि. ३१.०३.२०२० पर्यंत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिद्ध करावे.

I:\Corona\Solapur Corona Letters.doc